# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail :desk2a@dtemaharashtra.gov.in Internet :http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे तात्काळ

क्र.२अ/एडीएम /२०१९/ ८९५

दिनांक : - 7 DEC 2019

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

**विषय :** शै.र्ष २०१९-२० करिता अनुदानीती व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या महाविदयालयांना प्रवेश प्रकिया शुलक् आकरण्याबाबत..

**संदर्भ :** मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक प्रानिप्रा/प्र.क्र्.६६/नोंदणी प्रकिया/२०१९/१०६३, दि.६/१२/२०१९

उपरोक्त विषयासंदर्भीय परिपत्रकाची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. कृपया पहावे.

सदर परिपत्रकात नमूद करण्यात आलेल्या सूचना आपल्या विभागातील अधिनिस्त सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास तात्काळ आणण्यात यावे.

(प्रमोद नाईक)

सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

प्रत : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांना संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०१९/ 3657

दिनांक:- 9 DEC 2019

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व विनाअनुदानित सर्व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थां प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना प्रवेश प्रक्रिया शुल्क आकारण्याबाबत सोबत जोडलेल्या संदर्भिय परिपत्रकात दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक. प्रनिप्रा/प्र.क्र.६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/१०६३ दि.०६ डिसेंबर, २०१९

## परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना प्रवेश प्रक्रिया शुल्क आकारण्याबाबत...

संदर्भ : १. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे क्रमांक प्रनिप्रा/प्र.क्र.६६/नोंदणी प्रक्रिया/२०१९/९८७, दि.३१/१०/२०१९ रोजीचे परिपत्रक.
२. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे दि.२१/०९/२०१९ व ७/०९/२०१९ रोजींची पत्रे
३. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.०७/०८/२०१९ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. ४ व ५ मधील निर्णय.
४. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.२३/११/२०१६ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. ८ मधील निर्णय.
५. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.७/०८/२०१९ रोजीच्या बैठकीतील बाब क्र.४ नुसार शै. वर्ष २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठीचे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना अधिनियम, २०१५ कलम १६ मधील तरतुदीनुसार प्रवेश प्रक्रिया शुल्क निश्चित करण्यात आलेले आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना दि.३१/१०/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रवेश प्रक्रिया शुल्क भरण्याचे निदेश देण्यात आले आहेत. विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्काचा भरणा करावा.

१. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.७/०८/२०१९ रोजीच्या निर्णयाप्रमाणे शै. वर्ष २०१९-२० साठी प्रक्रिया शुल्क आकारण्यात येईल.
२. EWS या कोटयांतर्गत प्रवेशांचे वाटप हे कॅप कोटयातून झालेले असल्याने सदर प्रवेशांना रु.१००/- प्रति प्रवेशित विद्यार्थी, प्रवेश प्रक्रिया शुल्क अनुज्ञेय राहील.
३. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचे काही महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रिया शुल्क प्राधिकरणाकडे अद्याप भरलेले नाहीत. याप्रकरणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे प्रक्रिया शुल्क भरल्याशिवाय शै. वर्ष २०१९-२० च्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्यात येणार नाही. अशा संस्थांना शै. वर्ष २०१८-१९ चे प्रक्रिया शुल्क भरण्यास सफलता पोर्टलवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शै. वर्ष २०१८-१९ चे प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर अशा महाविद्यालयांना शै. वर्ष २०१९-२० चे प्रक्रिया शुल्क भरण्याची लिंक चालु करुन देण्यात येईल.

४. शै. वर्ष २०१८-१९ व २०१९-२० साठीच्या प्रक्रिया शुल्काचा भरणा केल्याशिवाय प्रवेश मान्यतेची कार्यवाही करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

५. शै. वर्ष २०१९-२० साठीचे प्रक्रिया शुल्क विहीत कालावधी भरणा न करणा-या महाविद्यालयांवर दंडात्मक कारवाई केली जाईल.

(संदीप कदम,) भा.प्र.से.
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य, सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत वरीलप्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरिता तथा उक्त निर्देश संचालकांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याच्या विनंतीसह अग्रेषित -

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
४. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
५. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे.
६. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.

प्रत माहितीकरिता अग्रेषित,

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा.सचिव, कृषी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१. सर्व परिक्षा समन्वयक/सहाय्यक परिक्षा समन्वयक, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.
२. मे. कल्प टेक्नोलॉजीस, प्रा. लि. पुणे यांना सदर परिपत्रकाप्रमाणे प्राधिकरणाचे सफलता पोर्टल अद्ययावत करण्याच्या अनुषंगाने अग्रेषित.
३. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.